CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र


नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २९७ वा ▶ बुधवार दि. २३ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## आज संध्याकाळी ६ वा. ४ मि.चांद्रयान लँडिंग



**दिल्ली ।** भारताची चंद्र मोहीम म्हणजेच चांद्रयान-३ चे लँडर २३ ऑगस्ट रोजी नियोजित वेळेनुसार म्हणजेच संध्याकाळी ६:०४ वाजता चंद्रावर उतरेल. मिशनची माहिती देताना इस्रोने सांगितले की, सर्व यंत्रणा वेळोवेळी तपासल्या जात आहेत. हे सर्व व्यवस्थित काम करत आहेत. यासोबतच इस्रोने चंद्राचे नवीन फोटो शेअर केले आहेत, जे चांद्रयान-३ ने क्लिक केले होते. चंद्रयानाने लँडर पोझिशन डिटेक्शन कॅमेराच्या मदतीने चंद्रावरून ७० किमी अंतरावरून ही छायाचित्रे घेतली आहेत.

## न्यूज कॉलम

### निकुंभे गावात धाडसी घरफोडी

**धुळे ।** तालुक्यातील निकुंभे गावात चोरट्याने धाडसी घरफोडी करीत घरातील एक लाखाच्या रोकडसह १ लाख ६४ हजार रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने मिळून एकूण २ लाख ६४ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल लंपास केला. अक्षय प्रकाश पाटील रा.निकुंभे याने दिलेल्या फिर्यादीनुसार, यात एक लाखाची रोकड, ४० हजार रूपये किंमतीचा सोन्याचा नेकलेस, ३५ हजार रूपये किंमतीचे कानातील सोन्याचे टोंगल, १७ हजार रूपये किंमतीची सोन्याची चेन, ७२ हजार रूपये किंमतीचे सोन्याचे दोन तुकडे असा एकूण २ लाख ६४ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल लंपास केला.

### भूमिहिन शेतकऱ्याने केली आत्महत्या

**धुळे ।** अक्कलपाडा धरणाच्या प्रकल्पांतर्गत पुनर्वसनात वडिलोपार्जित जमीन गेल्यानंतर भूमिहिन झालेल्या इच्छापूर (ता. साक्री) येथील राजेंद्र बुगा मारनर (वय ३२) या शेतकऱ्याने रविवारी (ता. २०) विषप्राशन करत जीवनयात्रा संपवली. त्यांच्यामागे पत्नी तसेच मुले आहेत. त्यांचे नातलग योगेश थोरात यांच्या माहितीवरून साक्री पोलिसांत मृत्यूची नोंद झाली.

# धुळ्यात कांदा प्रश्न पेटला

# कांदे फेकून केंद्र सरकारचा निषेध

**धुळे । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्कात ४० टक्क्यांनी वाढ केली आहे. परिणामी, कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. कांद्यास बाजारपेठ न मिळाल्याने हातातोंडाशी आलेला कांदा ऐन मोसमात रडवित असल्याने या निषेधार्थ उबाठा शिवसेनेने तीव्र आंदोलन छेडले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालया समोरच कांदा फेक करीत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी कांद्याच्या माळा गळ्यात घालून सरकारचा निषेधही करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आलेल्या या आंदोलनाने सार्यांचे लक्ष वेधून घेतले होते. एप्रिल ते जुलै महिन्याच्या कालावधीत ५० टक्के पेक्षा अधिक कांदा सडल्याने उकीरड्यावर फेकण्याची वेळ शेतकर्यांवर आली होती. गेल्या चार ते पाच वर्षांपासून ८०० ते १ हजार रूपयांपेक्षा अधिक भाव कांदा उत्पादक शेतकर्यांना मिळालेला नाही. कांदा भाव वाढीस सुरूवात झाल्याबरोबर केंद्र सरकारने ४० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. केंद्र सरकारचे हे धोरण अन्यायकारक असून यामुळे सामान्य शेतकर्यांचे जगणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे



**निर्णय रद्दची केली मागणी**

**पोलिसांनी तात्काळ आक्रमक आंदोलकांना ताब्यात घेतले असून यावेळी संतप्त ठाकरे गट शिवसैनिकांनी केंद्र सरकारच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी देखील केल्याचे बघावयास मिळाले. केंद्र सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांविरोधात घेतलेला निर्णय रद्द करावा अशी यावेळी संतप्त शिवसैनिकांनी मागणी केली आहे.**

### मंत्र्यांच्या गाड्यांवर कांदा फेक आंदोलन करू

**धुळे जिल्ह्याचे खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांनी कांद्या प्रश्न यावर अद्याप आपले तोंड उघडलेले नाही. खासदार सुभाष भामरे यांनी तातडीने संबंधित मंत्र्यांची भेट घेऊन कांद्यावरील निर्यात शुल्क रद्द करावा. तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांद्याला किमान दोन हजार रुपये क्विंटल मिळावा. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून रोखावे असे न झाल्यास धुळ्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचे आमदार खासदार आणि मंत्री यांच्या गाड्यांवर कांदा फेकून मारू आणि यापुढे आम्ही मंत्र्यांच्या गाड्यांवर कांदा फेक आंदोलन करू, असा गंभीर इशारा माजी आमदार शरद पाटील यांनी यावेळी दिला.**

या निर्णयाला केंद्र शासनाने त्वरीत स्थगिती द्यावी, अशी यावेळी करण्यात आली. कांदा निर्यात शुल्कात ४० टक्के वाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या विरोधात राज्यभरात आंदोलन करत निर्णयाचा निषेध केला जात आहे. त्यानुसार धुळ्यात देखील ठाकरे गट शिवसेनेने आंदोलन केले. जिल्हाधिकारी कार्यलयावर मोर्चा आणत शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. यावेळी आक्रमक शिवसैनिकांनी कांदे फेकून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर ठिय्या आंदोलन देखील केले. गेल्या चार ते पाच वर्षांपासून ८०० ते १ हजार रूपयांपेक्षा अधिक भाव कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मिळालेला नाही. कांद्याचे भाव वाढत असतानाच केंद्र सरकारने ४० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. केंद्र सरकारचे हे धोरण अन्यायकारक असून यामुळे सामान्य शेतकऱ्यांचे जगणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे या निर्णयाला केंद्र शासनाने त्वरीत स्थगिती द्यावी, अन्यथा शेतकऱ्यांचा उद्रेक होईल. येणाऱ्या काळात भाजपच्या पुढाऱ्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला. यासंदर्भात जिल्हाप्रशासनाला निवेदनही देण्यात आले. या आंदोलनात उबाठा शिवसेनेचे अतुल सोनवणे, महेश मिस्तरी, हिलाल माळी, प्रा.शरद पाटील, कैलास पाटील, बाबाजी पाटील, जनार्दन मासुळे, विलास चौधरी, नाना वाघ, तुषार भामरे यांचेसह देवराम माळी, जगदीश पाटील, दशरथ ठाकुर, नितीन पाटील, राजेंद्र माळी, सुनिल ठाकरे, भिवसन मराठे, विशाल अहिरराव, सुभाष पाटील, दीपक अहिरराव, गजानन पाटील, राजेंद्र पाटील, धमेंद्र पाटील आदी शिवसैनिक सहभागी झाले होते. दरम्यान, आंदोलनकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेत नंतर सुटका केली.

# बाजार समित्यांनी बंद मागे घ्यावा

## केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांचे आवाहन



### २ लाख मेट्रीक टन कांदा खरेदी करणार, गरज भासल्यास आणखी कांदा उचलणार

**नाशिक । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क लादल्यानंतर शेतकऱ्यांकडून महाराष्ट्रभरामध्ये प्रचंड रोष व्यक्त करण्यात येऊन संतापाची लाट उसळली आहे. नाशिकसह राज्यात विविध ठिकाणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन सुरु केले आहे. या कराचा सर्वाधिक फटका कांदा उत्पादकांना बसत असल्याने नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांनी बंद पुकारला आहे. बंद मागे घ्यावा असे आवाहन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी केले आहे. दरम्यान केंद्र नाफेड व अन्य संस्थामार्फत तब्बल २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करणार असून गरज पडल्यास आणखी कांदा खरेदी केला जाईल असे आश्वासन मंत्री डॉ. पवार यांनी यावेळी दिले.

नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांसह कांदा व्यापाऱ्यांनी संतप्त भावना व्यक्त केल्यानंतर केंद्र सरकार खडबडून जागे झाले आहे. कांद्यावरील निर्यात कर ४० टक्के केल्यामुळे जिल्ह्यातील बाजार समिती यांनी बंद पुकारला होता. तातडीने यावर डॅमेज कंट्रोल करण्यासाठी केंद्र सरकार मार्फत जोरदार हालचाली करण्यात आल्या. तर प्रसिद्धी माध्यमांच्या माध्यमातून या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी काल भाजप कार्यालयात केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधत केंद्राच्या निर्णयाची माहिती दिली.

दरम्यान राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय अन्न व पुरवठा मंत्री पियुष गोयल यांची दिल्लीत भेट घेतली. या भेटीनंतर केंद्र सरकार तब्बल दोन लाख मेट्रिक टन कांद्याची खरेदी करणार आहे. शिवाय नाशिक, अहमदनगर येथेही कांद्याची खरेदी केंद्रे असणार आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे केंद्र सरकार हा कांदा २४१० रुपये प्रतिक्विंटल या दराने खरेदी करणार आहे. निर्यात शुल्कावरुन कांदा प्रश्न पेटलेला असतानाच सरकारने मोठी घोषणा केली आहे. त्यामुळे आता कांदा व्यापारी व शेतकऱ्यांनी बाजार समिती मधील पुकारलेला बंद मागे घ्यावा, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी केले आहे.

या संदर्भात माहिती देताना डॉ. भारती पवार यांनी सांगितले की, केंद्र सरकारनें नाफेड आणि एनसीसीएफमार्फत महाराष्ट्रातील दोन लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. हा कांदा २,४१० रुपये प्रति क्विंटल दराने घेणार आहे. या कांदा खरेदीला कालपासूनच सुरुवात करण्यात आली आहे. आवश्यकता भासल्यास अधिकचा कांदाही खरेदी करणार असल्याचीही माहिती डॉ. भारती पवार यांनी दिली. अहमदनगर, नाशिक, लासलगाव केंद्रावरुन कांद्याची खरेदी होणार असल्याचे त्या म्हणाल्या.

# लक्ष्मी नगरात भरदिवसा घरफोडीच्या घटनेने शहरात खळबळ

**धुळे । प्रतिनिधी**

श्रावण मास सुरु असल्याने दर्शनार्थ मंदिरात जाणे सावंत परिवाराला चांगलेच महागात पडले आहे. दर्शन करुन घरी परतेपर्यंत चोरट्यांनी आपला डाव साधत किंमती ऐवज लांबवून नेला. देवपुरात भरदिवसा घडलेल्या या घटनेने मोठी खळबळ माजली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कन्हैयालाल पतपेढीत कार्यरत असलेले रमेश हिरामण सावंत आणि मनपाच्या कर्मचारी सौ. सुरेखा सावंत हे देवपुरातील लक्ष्मीनगरात प्लाट नं. ८ ब मध्ये राहतात. काल सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते देवदर्शनासाठी मंदिरात गेले होते. अवघ्या तासाभरात ते घरी परतले असता घर फोडलेले आढळले. चोरट्यांनी घरातील कपाट फोडून रोकड, सोन्याचे दागिने लंपास केल्याचे समजते. सदर घटनेची माहिती देवपूर पोलिसांना मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. नेमका किती ऐवज लंपास झाला. घरातील १२ ते



१५ तोळे वजनाच्या सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले आहे. रमेश सावंत हे कन्हैय्यालाल पतसंस्थेत मॅनेजर होते. ते अलिकडेच निवृत्त झाले आहेत. त्यांच्या पत्नी सुरेखा सावंत ह्या महापालिकेच्या नगरसचिव कार्यालयात कार्यरत आहेत. रमेश सावंत हे दररोज सकाळी ११ वाजेपूर्वी घराला कुलुप लावून सौ.सुरेखा यांना महापालिकेत सोडण्यासाठी जातात. दुपारी साडेबारा ते १ वाजेच्या सुमारास ते घरी जातात. हा त्यांचा नित्यक्रम आहे. याचीच पुरेशी माहिती घेवून रेकी करत चोरट्यांनी संधी साधली. चोरट्यांनी रमेश सावंत यांच्या मुख्य दरवाजाचा कडीकोंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून घरातील सुमारे १२ ते १५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरुन नेले.विशेष म्हणजे या घरापासून २०० मिटर अंतरावर सीसीटीव्ही आहे. हा सीसीटीव्ही चोरट्यांनी आपण नजरेत येणार नाही अशा पध्दतीने फिरविला होता.त्यामुळे पुर्ण रेकी करुन चोरट्यांनी ही चोरी केल्याचे कळते. घटनेची माहिती कळताच देवपूर पोलिस ठाण्याचे पीआय सतीश घोटेकर, पीएसआय राजेश इंदवे, एएसआय मिलिंद सोनवणे, हे.कॉ.पंकज चव्हाण, एलसीबीचे मुकेश वाघ,जितेंद्र वाघ,शशी वाघ श्वान पथकासह घटनास्थळी दाखल झाले होते.

# ऐश्वर्या रायच्या डोळ्याबद्दल वक्तव्य गावितांना भोवलं

**मुंबई । प्रतिनिधी**

मासे खा. डोळे सुंदर होतात. मग मुलीही पटतात. ऐश्वर्या रायचे डोळे मासे खाल्ल्यामुळं सुंदर आहेत, असं वक्तव्य राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांनी केलं. त्यावरुन राज्यात मोठा वाद निर्माण झाला आहे. राज्याच्या महिला आयोगाने विजय कुमार यांच्या वक्तव्याची दखल घेऊन त्यांना नोटीस पाठवली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी या विषयावर आपली भूमिका मांडली. विजयकुमार गावित हे डॉक्टर आणि माजी वैद्यकीय शिक्षणमंत्रीदेखील आहेत. त्यामुळे त्यांच्या वक्तव्यावर आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.

हे वक्तव्य आपल्यावरच उलटतय हे लक्षात आल्यानंतर विजयकुमार गावित यांनी, माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला असा दावा केला. ऐश्वर्या राय ही माझ्या मुलीसारखी आहे अस गावित म्हणाले. फिश ऑईलचे फायदे आदिवासी लोकांना समजावून सांगत होतो. आरोग्यासाठी मासे चांगले असल्याचं मी म्हणालो असही गावित म्हणाले. विजयकुमार गावित यांनी सार्वजनिक कार्यक्रमात काही गोष्टी सांगत असताना, ज्या पद्धतीने उल्लेख केला ते निश्चितच महिलांच अपमान करणारा वकत्तव्य आहे. राज्य महिला आयोगाला काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत असं रुपाली चाकणकर म्हणाल्या. महिला आयोगाने त्या तक्रारींची दखल घेतं, त्यांना नोटीस पाठवली आहे. त्यांना उत्तर देण्यासाठी तीन दिवसांचा कालावधी आहे असं रुपाली चाकणकर म्हणाल्या. महिला आयोग हा महिला सक्षमीकरण आणि सबलीकरणासाठी काम करत असतो. समाजात काम करत असताना, अशा घटना घडतात. त्याची आम्ही दखल घेतो. पण ज्या पद्धतीने हे वक्तव्य केलय, विजयकुमार गावित यांनी त्याचा खुलासा सादर करावा, त्यांचा उद्देश काय आहे? त्याची यामागची भूमिका समजेल असं रुपाली चाकणकर म्हणाल्या.

# दरोड्याच्या तयारीत असताना मुसक्या आवळल्या!

**सोनगीर । प्रतिनिधी**

धुळे तालुक्यातील लामकाणी येथील एका दुकानावर दरोड्याचा तयारीत असलेल्या संशयित चोरट्यांचा कट उधळण्यात सोनगीर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी आठ संशयित आरोपींना अटक करून त्यांच्या विरोधात सोनगीर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. यातून बळसाणे व चिमठाणे येथे झालेल्या चोरीच्या घटनाची कबुली संशयित आरोपींनी दिली आहे.

याप्रकरणातील काही मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. सोनगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धुळे तालुक्यातील सरवड गावाच्या शिवारात येथील पोलिसांचे पथक रविवारी मध्यरात्री पेट्रोलिंग करीत असतांना सरवड फाटा ते सरवड गावाच्या दरम्यान असलेल्या लामकाणी गावाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर पोलिसांना आठ ते नऊ तरुण संशयास्पद उभी असलेली दिसुन आलेत. यावेळी पोलिसांचे वाहन



पाहून संशयित चोरट्यांनी पळ काढला. मात्र यातील दोघांना पकडण्यात सोनगीर पोलिसांना यश आले. संशयित आरोपीकडे एक लोखंडी कटर, दोन धारदार चाकू, मिरचीची पुड, सुमारे पन्नास हजार रुपये किंमतीची एमएच १८ बीडब्लु ४१४८ क्रमांकाची मोटरसायकल व दोरखंड अश्या वस्तू मिळून आल्या. यावेळी पोलिसांनी दोघे संशयित चोरट्यांना खाक्या दाखविल्यावर धुळे तालुक्यातील लामकाणी येथील एका मोबाईल दुकानात चोरीच्या तयारीत जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पळून गेलेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी सोनगीर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश फड यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक तयार करण्यात आले. ताब्यात असलेल्या एका संशयित अल्पवयीन आहे. त्याच्याकडे चौकशी केली असता बळसाणे येथील काळू भटू भिल (वय ३१), योगेश शायसिंग मोरे (वय २६), व अन्य एकाने मागील महिन्यात बळसाणे येथील जैन मंदिरात चोरी केल्याचे कबुली त्याने दिली. या गुन्ह्यातील ३० हजारांची रोकड पोलिसांनी हस्तगत केली आहे. याबाबत निजामपुर पोलीस ठाण्यात कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद आहे. तसेच शिंदखेडा पोलीस ठाणे हद्दीतील चिमठाणे येथील मागीलच महिन्यात मोबाईल दुकानात चोरी केल्याचे सांगितले. त्यातील चोरी केलेला माल फरार आरोपीकडे असल्याचे सांगितले.

# शस्त्रधारकांची दहशत : गुन्हेगारांकडून सर्रासपणे पिस्तुलांचा वापर

धुळे जिल्ह्यात गुन्हेगारीचा आलेख पाहता तो चढाच असल्याचे पोलिस ठाण्यांमध्ये दाखल गुन्ह्यांच्या आकडेवारीतून समोर येत आहे. त्यात किरकोळ गुन्ह्यांसह सध्या घडलेल्या गुन्ह्यांमध्ये झालेला बंदुकांचा वापर हा चिंताजनक आहे. शहरातील कॉटन मार्केटच्या पाठीमागे रहाणार्या पंजाबी सॉ मीलचे मालक विनोद भसीन यांच्या घरावर आज मध्यरात्रीच्या सुमारास धाडसी दरोड्याच्या घटनेने चिंता अजून वाढली आहे. पोलिसांसमोर परवानाधारक आणि बेकायदा बंदुकींचे आव्हान आहे.

नागरिकांची वाढती लोकसंख्या पाहता, सर्वच पोलिस ठाण्यांमधील पोलिसांच्या मनुष्यबळात मोठी तफावत आहे. त्यामुळे एकीकडे अपुरे मनुष्यबळ आणि दुसरीकडे वाढती

**पाठ थोपटून घेण्यासाठी कारवाया**

**शहर व ग्रामीण गुन्हे शाखेतील पोलिस कर्मचारी केवळ वरिष्ठांकडून पाठ थोपटून घेण्यासाठी अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कारवाया करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण शस्त्र कशासाठी आणले होते? कोठून आणले होते? कसे मिळाले? या प्रश्नांची उत्तरे संबंधित पोलिस शोधताना दिसत नाहीत. परिणामी शस्त्र खरेदी-विक्रीचे वर्षानुवर्षे चालत आलेले रॅकेट उद्धस्त करण्यात पोलिस अपयशी ठरत आहेत. याचाच गैरफायदा सराईत गुन्हेगार घेत आहेत. त्यामुळे ही कारवाई केवळ दिखाव्यापुरती मर्यादित न राहता सखोल तपास होणे आवश्यक आहे.**



### टोळी सक्रिय असल्याचा संशय

**जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गावठी कट्टे असल्याची शंका नाकारता येत नाही. अवैध धंद्यांप्रमाणेच गावठी कट्टा बाळगणार्यांवरही कारवाई होण्याची गरज आहे.**

गुन्हेगारी अशी परिस्थिती उद्भवली आहे. त्यात घरफोडी, दुचाकी चोरी आणि मारहाणीच्या वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांचा आलेख कमी करण्यात पोलिसांची दमछाक होत असताना बंदुकीच्या संख्येकडे लक्ष टाकल्यास त्यात मोठी वाढ झाल्याचे समोर आले आहे. वाढत्या गुन्हेगारीमुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. त्यातच अनेक गुन्ह्यांमध्ये सर्रासपणे अग्निशस्त्रांचा वापर होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे. पोलिस दलाकडून गुन्हेगारी रोखण्यासाठी गुन्हेगारी टोळ्यांवर संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मोका) कारवाई करण्यात येत असली तरी गुन्हेगारी कमी झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून अवैध अग्निशस्त्रांची खरेदी-विक्री रोखण्यासाठी कठोर उपाययोजना होणे आवश्यक बनले आहे.



**शोध बातमी**
**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

**कोणत्या घटनांमध्ये**

**आढळली पिस्तुले**

जिल्ह्यात खून, दरोडा, धमकावणे आणि खंडणी वसुलीच्या प्रकरणात राजरोसपणे पिस्तुलाचा वापर केला जात आहे. चोरी, घरफोडीच्या गुन्ह्यात आणि तसेच निर्जन ठिकाणी रस्त्यात अडवून लुटण्यासाठी पिस्तुले वापरली जातात. याची नोंद पोलिस ठाण्यातील गुन्हयांमध्ये नोंदविली गेली आहे.

# दुचाकीवरून गांजाची वाहतूक

### सव्वादोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**धुळे । प्रतिनिधी**

जुना मुंबई-आग्रा महामार्गावरील सुळे रस्त्यावरून एक इसम दुचाकीवर गांजाची वाहतूक करणार असल्याची गुप्त माहिती सपोनि जयेश खलाणे यांना मिळाली होती. त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईत दुचाकीवरून गांजाची वाहतूक करणार्या इसमास शिरपूर तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले.

या कारवाईत दुचाकीसह सव्वादोन लाखांचा मुद्देमाल पथकाच्या हाती लागला. दि.२१ ऑगस्ट रोजी दुपारी १२.३५ च्या सुमारास जुना मुंबई-आग्रा हायवेवरील तेल्यादेव मंदिराजवळून एम.एच.१८/बी.एस.९५४० क्रमांकाच्या दुचाकीवर एक इसम गोण्यांमधून गांजाची वाहतूक करणार असल्याची गुप्त माहिती सपोनि जयेश खलाणे यांना मिळाली. श्री.खलाणे यांनी पथकास कारवाईच्या सुचना केल्या. त्यानुसार मुंबई-आग्रा महामार्गावरील तेल्यादेव मंदिराजवळ पथकाने सापळा रचला. या ठिकाणी दुपारी १२.३५ वाजेच्या सुमारास संशयित इसम दुचाकीवरून येतांना दिसला. पोलिसांची चाहुल लागताच दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी करुन तो पसार झाला.

## कांद्यामुळे वांदा..!

कांदा हे पीक अत्यंत लोकप्रिय आहे आणि तितकेच शेतकऱ्यांच्या दृष्टीने संवेदशनशीलही आहे. या पिकाच्या बाबतीत जरा अधिक उणे झाले की लगेचच शेतकऱ्याच्या संतापाचा पारा चढतो. आता केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्क ४० टक्के केले आणि लगेचच शेतकरी संतापाने पेटून उठले. त्यांच्या उत्पन्नात काय परिणाम होणार आहे, हे त्यांना जाणवले आणि लगेचच कांदा लिलाव बंद पाडण्याचा प्रयत्न केला गेला. हे सत्य आहे की, टोमॅटोची किंमत सध्या थोडी कमी झाली आहे आणि ग्राहक राजाने सध्या सुटकेचा श्वास घेतला आहे, तर कांद्याने वांदा निर्माण केला आहे. कांद्यावरील निर्यात शुल्क ४० टक्के इतके केले याचा अर्थ शेतकऱ्याना कांदा पिकाला भाव मिळणार आणि परिणामी ते बाजारात कांदा आणणार नाहीत. परिणामी कांदा दुर्मीळ होऊन ग्राहकांसाठी आणखी महाग होईल. कांदा हा नेहमीच राजकारण आणि सामान्य लोकांच्या जिव्हाळ्याचा राहिला आहे. दिल्ली सरकारही या लहानशा कांद्याने कोसळवले होते. तेव्हा सुषमा स्वराज मुख्यमंत्री होत्या. कांद्याने नेहमीच भाजपलाच अडचणीत आणले आहे. पण केंद्राला कांद्याच्या निर्यातीवर शुल्क ४० टक्के करणे भागच पडले आहे. कारण कांदा ग्राहकांना मिळण्यात अडचणी आहेत. मुळात सरकारला केवळ शेतकरी एके शेतकरी किंवा ग्राहक एके ग्राहक असा विचार करून चालत नाही. सरकारला या दोन्ही घटकांमध्ये समतोल साधावा लागतो. ग्राहक नाराज झाले तर आणि शेतकरी नाराज झाले तरीही सरकारचे भवितव्य धोक्यात येतेच. आताही तसेच होण्याची शक्यता आहे. कारण ग्राहक नाराज होण्याची भीती आहे. १९८३ मध्ये काँग्रेसचे सरकार असताना प्रथम कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा करण्यात आला. त्यानंतर बाजार समित्या स्थापन करण्यात आल्या. शेतकऱ्याची आडत्याच्या जाचातून सुटका करण्यासाठी या समित्या होत्या, असे सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात तसे काही झाले नाही. कांद्याच्या बाबतीत आज जी परिस्थिती शेतकऱ्यांवर ओढवली आहे. त्याला तेच जबाबदार आहेत. कारण त्यांनी जर कृषी कायद्यांना विरोध केला नसता, तर मात्र त्यांच्यावर आज हे संकट आले नसते. त्यांची पाचही बोटे तुपाशी अशी अवस्था झाली असती. यात अतिशयोक्ती अजिबात नाही. कांद्यावर निर्यातीलाच काही राजकीय पक्षांचा विरोध आहे. कांदा या विषयाचा राजकीय पक्ष जितका उपयोग करून घेतात तितका तो कुणीही करून घेत नाहीत. आता निर्यात शुल्क ४० टक्के केले म्हणजे अनेक राजकीय पक्ष या स्थितीचा आपल्या भल्यासाठी फायदा घेणार हे स्पष्ट आहे. यातून मोदी सरकारवर कुरघोडी करण्याचा एक सोपा उपाय सापडला, इतकाच काय तो आसुरी आनंद विरोधकांना मिळत आहे. कांदा हे पीक जसे महाग आहे तसेच ते अत्यावश्यकही आहे. त्यातील किमतीच्या चढउताराचा चटकन परिणाम ग्राहकांच्या रोजच्या जेवणावर होतो. ते स्वयंपाकात नसले तर ग्राहकांच्या जेवणात चव राहात नाही. त्यामुळे कांद्यावरील निर्यात शुल्क वाढवल्याने शेतकरी आणि ग्राहक हे दोघेही नाराज आहेत. ही अवस्था फार दिवस सरकारला ठेवता येणार नाही. सरकारने कांद्याचा बफर स्टॉक भरपूर ठेवला आहे. त्यातून कांदा जसे आवश्यक असेल तसे बाजारा आणला जाईल आणि योग्य प्रमाणात कांदा बाजारात आणल्याने ग्राहकांना तो परवडण्यासारखा देता येईल. कांद्याच्या पिकावर हवामानाचा परिणाम झालेला नाही, जसा तो टोमॅटोच्या पिकावर झाला होता. त्यामुळे कांद्याचे पीक उत्पादन भरपूर झाले आहे. आता शेतकऱ्यांनी कांदा बाजारात आणण्यावर त्याची उपलब्धता आणि भाव हे दोन घटक ठरणार आहेत. शेतकरी केंद्र सरकारचा कोणताही निर्णय भाजपने घेतला आहे, असे समजतात. त्यातच शेतकऱ्यांना भडकवणारे कित्येक राजकीय पक्ष काम करत असतात. वास्तविक उबाठाचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या नावाने गळे काढूनच सत्ता बळकावली होती. त्यानंतर त्यांनी अडीच वर्षांच्या काळात शेतकऱ्यांसाठी काहीही केले नाही. त्यामुळे आता जरी विरोधक केंद्र सरकारच्या नावाने शंख करत असले तरीही त्यांना तो अधिकार नाही.

## मंदी चीनमध्ये; धास्तावले जग



चीनमधील सरकार कर्जात बुडाले आहे. नियामक भ्रष्टाचार रोखण्यासाठी ते कंपन्यांवर कारवाई करण्याचा प्रयत्न करत आहे. पण बेरोजगारी विक्रमी पातळीवर आहे. ही आकडेवारी चिंतेचे कारण ठरू शकते, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. आणखी काही काळ अशीच स्थिती राहिल्यास चीनचा आर्थिक विकास दर यंदा कमी होऊ शकतो. देशात आधीच खर्च कमी केला जात आहे. त्यामुळे उत्पादनही कमी होऊन बेरोजगारी वाढू शकते.

चीनची अर्थव्यवस्था एका नव्या समस्येला तोंड देत आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये प्रथमच या वर्षी जुलैमध्ये देशात ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किमती चिंताजनकरीत्या कमी झाल्या. महागाईचे मोजमाप करणाऱ्या ग्राहक निर्देशांकानुसार गेल्या महिन्यात वस्तूंच्या किमती वर्षापूर्वीच्या परिस्थितीच्या तुलनेत कमी झाल्या आहेत. या देशाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. बाजारात वस्तूंची मागणी कमी असते, उत्पादन गरजेपेक्षा जास्त असते किंवा ग्राहक पैसे खर्च करू इच्छित नसतो, तेव्हा चलनवाढ होते. अशीच परिस्थिती असल्याने बाजारातील मागणी वाढवून देशांतर्गत बाजारपेठेत स्थैर्य आणण्यासाठी चीनवर दबाव निर्माण झाला असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. या आधी ८ ऑगस्ट रोजी चीनच्या आयात-निर्यातीचा अहवाल आला. त्यात मागील महिन्यात देशाची आयात आणि निर्यात दोन्ही कमी असल्याचे म्हटले होते. अलीकडच्या काळात आर्थिक परिस्थितीत मोठे बदल घडवून आणण्यासाठी चीनने अवलंबलेल्या धोरणाचा तो परिणाम नाही का, असा प्रश्न निर्माण होत आहे. कारण चीनमध्ये वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणात घसरत आहेत. या पार्श्वभूमीवर स्वस्त चिनी माल जागतिक बाजारपेठेत पोहोचल्यास इतर देशांच्या कंपन्यांवर नकारात्मक परिणाम होईल. म्हणजेच येऊ घातलेल्या स्वस्त चिनी उत्पादनांमुळे अनेक देशांमध्ये बेरोजगारी वाढण्याचा धोका आहे. याचा परिणाम कंपन्यांच्या नफ्यावरही होणार आहे. कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी २०२० मध्ये अनेक देशांतर्फे चीनवर कडक निर्बंध लादले गेले होते. जगातील सर्व देश महामारीच्या प्रभावातून बाहेर आले आणि परिस्थिती हळूहळू सामान्य होऊ लागली. चीनची अर्थव्यवस्था मात्र आजही संकटाशी झुंज देत आहे.

एकीकडे साथीच्या रोगामुळे पुरवठा साखळी ठप्प झाली होती आणि चीनच्या देशांतर्गत बाजारपेठेत सामसूम झाली होती. दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेसह इतर काही देश चीनबरोबरचे व्यापारी संबंध तोडण्याची भाषा करत होते. गेल्या वर्षीच्या जुलैच्या तुलनेत या वर्षी जुलैमध्ये चीनची निर्यात १४.५ टक्क्यांनी कमी झाली, तर आयात १२.४ टक्क्यांनी घसरली. या देशाला देशांतर्गत पातळीवरही मोठ्या उलथापालथीचा सामना करावा लागत आहे. त्याच्या 'रिअल इस्टेट मार्केट'ला काही काळापासून अडचणींनी घेरले आहे. या देशातील 'एव्हरग्रेंड' ही सर्वात मोठी रिअल इस्टेट कंपनी दिवाळखोरीच्या मार्गावर असून सरकार या क्षेत्राला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करत आहे. कोरोनानंतर २०२० मध्ये चीनचा स्थिर विकास दर झपाट्याने घसरला आणि एका वर्षापूर्वीच्या सहा टक्क्यांवरून २.२ वर येऊन थांबला. त्यानंतर त्याची अर्थव्यवस्था तेजीत आली आणि २०२१ मध्ये ८.४ टक्क्यांवर पोहोचली.

जागतिक बँकेच्या म्हणण्यानुसार, गेल्या वर्षीची आकडेवारी पाहता आयात आणि निर्यात या दोन्हीत घट झाल्यामुळे चीनचा विकास दर तीन टक्क्यांपर्यंत खाली आला, जो १९७६ नंतर (कोरोना महामारीचे वर्ष वगळता) सर्वात कमी आहे. चीनने जून २०२३ मध्ये २८५.३२ अब्ज डॉलरची निर्यात केली होती. ती जुलैमध्ये २८१.७६ अब्ज डॉलर इतकी कमी झाली. जूनमध्ये २१४.७० अब्ज डॉलरची आयात झाली होती. जुलैमध्ये ती २०१.१६ अब्ज डॉलर झाली. जूनमध्ये चीनची निर्यात १२.४ टक्क्यांनी तर आयात ६८ टक्क्यांनी कमी झाली आहे. दुसरीकडे, भारतात चीनमधून होणारी आयात दर वर्षी सुमारे १९.५ टक्के दराने वाढत असताना, चीनमधील निर्यात सुमारे १६.६ टक्के वार्षिक वाढ नोंदवत राहिली. २०२१ मध्ये भारताने चीनकडून ९४.१ अब्ज डॉलरची आयात केली तर चीनला होणारी भारताची निर्यात २३.१ अब्ज डॉलर होती. १९९५ मध्ये चीनमधून भारताला होणारी आयात ९१४ दशलक्ष होती. चीनला होणारी निर्यात ४२४ दशलक्ष डॉलर होती. २०२३ पर्यंत ही आयात-निर्यात घटली. मे २०२३ पर्यंत भारताने चीनकडून ९.५ अब्ज डॉलरच्या वस्तूंची आयात केली, तर भारतातून चीनला १.५८ अब्ज डॉलर निर्यात झाली.


२०२२ मध्ये दोन्ही देशांमधील व्यापार १३६ अब्ज डॉलर इतका झाला. या काळात दोन्ही देशांमधील संबंध आतापर्यंतच्या सर्वात खालच्या पातळीवर होते आणि व्यापाराचा आकडा शंभर अब्ज डॉलरच्या पुढे गेला होता. कोरोनानंतर बहुतांश देशांनी निर्बंध हटवले आणि खर्च करत नसलेल्यांनी खरेदीला सुरुवात केली. बाजारात मागणी वाढू लागली आणि कंपन्यांनी मागणीचा पुरवठा सुरू केला. दरम्यान, युक्रेनवर झालेला रशियाचा हल्ला आणि ऊर्जेच्या वाढत्या किमतींमुळे अनेक गोष्टींची मागणी झपाट्याने वाढू लागली. परिणामी, महागाई वाढू लागली; पण चीनमध्ये असे काही घडले नाही. चीनची अर्थव्यवस्था कोरोनातून बाहेर आली तेव्हा काही काळ वेगाने प्रगती झाली; पण नंतर वस्तूंची मागणी वाढलेली दिसली नाही. फेब्रुवारी २०२१ मध्ये ग्राहक निर्देशांक घसरला. मागणी सतत घसरत राहिली आणि या वर्षाच्या सुरुवातीला परिस्थिती इतकी बिकट झाली की, कंपन्यांना उत्पादनखर्चही भरून काढणे कठीण झाले. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, घसरलेल्या किमतींमुळे चीनसमोर कमी विकासदरासारखे आव्हान उभे राहिले आहे. चीन सरकार वारंवार अर्थव्यवस्था नियंत्रणात असल्याचे संकेत देत आहे; परंतु काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे की सरकारने आर्थिक वृद्धी वाढवण्यासाठी आतापर्यंत कोणतीही प्रभावी पावले उचलली नाहीत. आज चीन मंदीच्या दिशेने जात आहे. चीनला समजले आहे की निर्यात आधारित अर्थव्यवस्था पुरेशी नाही. देशांतर्गत बाजारावरही लक्ष केंद्रित करावे लागेल. चीन ही एक मोठी बाजारपेठ आहे. वस्तूंच्या किमती कमी केल्याने स्थानिक ग्राहकांसाठी वस्तू स्वस्त होतील आणि देशांतर्गत वापर वाढेल, असे चीन सरकारला वाटते. दरम्यान, चीनच्या मध्यवर्ती बँकेने (पीपल्स बँक ऑफ चायना) ग्राहक निर्देशांक पुन्हा वाढण्यास सुरुवात होईल, अशी अपेक्षा असल्याचे म्हटले आहे. चीनच्या मध्यवर्ती बँकेने म्हटले आहे की, आम्ही लागू केलेल्या धोरणांचा परिणाम होऊ लागला आहे.

**क्रमशः**

**- प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

## आता आम्ही ही परीक्षा द्यायची का?

सध्या महाराष्ट्रात या एजंट लोकांसाठी राहू मामा कांबळे यांनी महाराष्ट्र रिअल इस्टेट एन्जन्ट ही एकमेव काम करणारी संघटना असून तिचे सध्या हजारांच्या आसपास सभासद आहेत. या संघटनेच्या मार्फत हे एजंट लोक सध्या एका छताखाली आपल्या न्याय मागण्यांसाठी एकत्र आहेत. ग्राहकांच्या मूलभूत हक्कांसाठी व त्यांची फसवणूक होऊ नये व त्यांना सुरक्षितता मिळावी म्हणून रेरा स्थापन झाले, मात्र या एजन्टाना परीक्षा देण्याच्या नावाखाली तेथे परप्रांतीय दलालांची भरती करण्याचा हा डाव असल्याचे येथील लोकांचे म्हणणे आहे. जर या दलालांची भरती झाली तर मराठी माणूस या क्षेत्रातून पूर्णपणे उठेल व परप्रातीय दलालांची मनमानी व अडवणूक सुरु होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आजही मुंबई शहरात काही समाजातील व्यक्तींना, सिनेक्षेत्रातील व्यक्तींना, एकट्या स्त्रीला, घर भाड्याने मिळणे सुद्धा कठीण होते, मात्र माणुसकीच्या नात्याने व तडजोडी करून, वेळप्रसंगी हे एजंट त्यांच्या जबाबदारीवर घर मिळवून देतात, जर यानंतर काही ठरावीक दलालांची मक्तेदारी निर्माण झाल्यास ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होण्याचा मोठा धोका आहे. म्हणून आता तरी सरकारने आपल्या मागण्यांकडे लक्ष द्यावे अशी मागणी या एजंटांनी सुरू केली आहे.




या एजंटांची असंघटित कामगार म्हणून नोंद करावी, नोंदीत एजंटांना मासिक पेन्शन किमान पाच हजार लागू करावी. या एजंटांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजन लागू करावी, एजंटांना प्रधानमंत्री जीवन ज्योत विमा लागू करावी, त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळावा, एजंटांना काम करत असताना मृत्यू झाल्यास त्यांना पाच लाख मिळावेत, एजंटांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांना किमान दोन लाख मिळावेत, एजंटाच्या कुटुंबातील सदस्यांचा विमा योजनेचा लाभ मिळावा, एजंट यांच्या मुलांना शैक्षणिक, आर्थिक सहाय्य मिळावे, एजंट यांच्या पत्नीस दोन आणि त्यापर्यंत नैसर्गिक प्रसूतीसाठी १५ हजार मिळावेत, नोंदीत एजंट यांच्या मुलांना दहावी व बारावी मध्ये ५०% किंवा अधिक गुण मिळाल्यास दहा हजार एवढे प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य मिळावे, एजंट यांच्या मुलांना दहावी व पुढच्या शिक्षणासाठी प्रति वर्ष किमान २० हजार शैक्षणिक आर्थिक सहाय्य मिळावे, एजंटांच्या मुलांनी शैक्षणिक बारावीमध्ये ८० टक्के गुण मिळवल्यास त्यांना अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळावे, नोंदीत एजंट यांच्या एका मुलीच्या जन्मांतर पती-पत्नीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीचे नवे किमान पाच लाखांचे आर्थिक सहाय्य मिळावे, नोंदीत एजंट एखादी जागा किंवा रूम दाखवून व्यवहार ठरल्यास काही व्यक्ती कमिशन देत नाहीत. त्यावेळेस पोलीस संरक्षण मिळावे तसेच एजंटांना मेहनतीने मिळवलेल्या कमिशनच्या रकमेवर आयकर लागू नये. या मागण्या गेली कित्येक वर्षे ही मंडळी करत आहेत, वेळप्रसंगी आझाद मैदानात आंदोलनही करून झाली मात्र आश्वासनांच्या पलीकडे यांना काहीही मिळत नाही. आपल्या मूलभूत हक्कांसाठी ही मंडळी लढत असून आता तरी आपले सरकार आल्याने यांच्या आशा पल्लवीत झाल्या असून मुंबईतून मराठी माणसाची मोठी संख्या कमी झाली आहे. आता तरी येथील स्थानिक मराठी वर्ग टिकावा यासाठी यांना न्याय द्यावा व त्यांच्यावरील अन्याय दूर करावा हीच यांची अपेक्षा आहे.

**समाप्त:**

**- मुंबई डॉट कॉम : अल्पेश म्हात्रे**

## शब्दकोडे-१५८



**आडवे शब्द** -३. इच्छा, आशा ५. विपुल, पुष्कळ ८. मज्जाव (करणे) ११. 'फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार,...' १३. '... घेता, नाम घ्या श्रीहरीचे' १४. फांदी १६. पत्त्यांचा एक खेळ १९. शोक २४. वेलीचा मांडव २५. पृथ्वी २७. फुटक्या नशिबाचा २८. चांगले २९. कागदाचे असते, दोऱ्याचे आणि चलतचित्रपटाचेही! ३०. तोरा ३१. जहाज ३२. भ्रम ३३. शिवधनुष्य ३५. हिस्सा ३६. ब्राह्मण ३८. पुरेल इतका ३९. सलगी ४२. श्रम ४३. इतर ठिकाणी ४५. राजाचा अवाजवी आग्रह ४८. सोने ५०. नेत्र ५१. शुल्क (इंग्रजी) ५२. कौशल्य ५४. शस्त्राची तीक्ष्ण कड ५५. नुकसान ५६. संपूर्ण ५७. प्रगटन ५८. गोष्ट ५९. कुंतीचा थोरला पुत्र ६०. पायताण ६२. पंख ६३. मोठेपणा ६४. बालपणीचे दृढ संस्कार ६६. सर्वांचे याअर्थी वापरला जाणारा प्रत्यय- उदा. -- त्रिक ६७. अंत:पुर, जनानखाना ६९. तोंडाने वाजवण्याचे धातूचे एक चपटे छोटे वाद्य ७०. पाप ७२. अडाणी, माहिती नसलेला ७३. म्हातारपणच्या अनुचित सवयी ७५. पाऊस ७६. लोणी ७७. कंबर ७८. कौशल्य

**उभे शब्द** -

१. विस्तारपूर्वक २. तळे ३. जोर, त्वेष ४. एकटा ५. मोकळीक ६. माळजमीन ७. नकली जात ८. मुलींचे एक नाव, गुहा आडनावाच्या जुन्या नटीचे नाव ९. एकाग्र दृष्टी, नजर १०. काव्य १२. चित्रकाराची 'लेखणी' १५. अस्थी १७. प्रिय व्यक्तींचे एकत्र येणे १८. अपवित्र १९. अनपेक्षित, उलट २०. पंधरवडा २१. देवाची अर्चना २२. पराकाष्ठा २३. अतिशय प्रयत्न २६. मानलेला मुलगा २८. विद्यार्थी ३१. त्वचारोग ३१अ. गुलकाडीने पेटणारी, गुल होणारी! ३३. मोराचे सौंदर्य यात असते ३४. भांडण ३५. रस्ता ३७. नीरव ४०. पटकन खाऊन टाकणे ४१. पृथ्वी ४३. ऊस ४४. जखमांमधून रक्त वाहत असलेला ४६. पृथ्वीचा पाण्याने व्यापलेला पृष्ठभाग ४७. दूर ४९. तोंडदेखले ५०. लगेच ५३. उत्सव ५७. शर्त ६०. खेड्यातील रहिवासी ६१. सकल ज्ञान असलेला ६२. गादिमांनी सांगितलेले अजरामर सत्य. '----- आहे जगती पुत्र मानवाचा' ६३. मत्स्य ६४. मंडई ६५. ललाट ६६. अभिनयासह ६८. भावजय ६९. थापा मारणारा ७१. कावेबाज ७२. इतर ७४. चामडे

### शब्दकोडे १५७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

३.बाजारगप्पा ६.रात्रंदिवस ९.विश्वासघातकी ११.तम १२.काग १३.शीर १५.नकली १७.कलावती १८.कढत २०.बेशरम २१.अलग २२.अटक २४.पण २७.पराधीन २९.तग ३०.यार ३१.सूज्ञ ३२.कवच ३४.टक्का ३५.खच ३६.ब्र ३७.नकार ३९.हनन ४१.रीत ४३.समा ४४.मदतनीस ४६.शाखा ४९.डरकाळी ५०.जतन ५१.जलद ५२.काका ५४.वपा ५५.सुगी ५६.सफल ५७.पवनपुत्र ५९.खतरा ६१.मैदा ६२.वड ६३.फुरसत ६४.तास ६७.कीटक ७०.हजरजवाबी ७४.पाटव ७६.बडगा ७८.वारा ८०.जहाल ८१.जाफराबादी ८२.नयन ८३.रेघ

उभे उत्तर -

१.अश्वारूढ २.मधाशी ३.बाकी ४.रत ५.गमन ६.राग ७.दिवेलागण ८.सवतीमत्सर १०.तरबेज १२.अवगाहन २२.अनवरत २३.कात २४.भाविक २५.अज्ञ २६.टक २७.पचका २८.धीट २९अ.गमन ३०.याचना ३१.सुपारी ३३.वनमाळी ३८.रमणी ३९.हसतमुख ४०.नशा ४२.तडकाफडकी ४३.सकाळ ४५.नीज ४७.खाजगी ४८.कदरदान ५२.कासव ५३.अवसर ५४.वपु ५४अ.पात्रता ५५.सुरा ५७.पर ५८.नत ६०.तक्रार ६३.फुकट ६५.सह ६६.टपाल ६९.कडबा ७१.जमीन ७२.जवान ७३.मौज ७५.वजा ७६.बरा ७७.गादी ७९.मेघ

## सोभाव



मानूसना जनम हाऊ कोनत्यातरी परिस्थितीमा व्हस. त्यानावर त्याना घरमातल्या परिस्थितीना परिनाम त्याना जनमले येवाना पयिले म्हनजे मायना पोटमाच गर्भावस्थामा असताना त्यावर व्हत ऱ्हास . त्यानी घरमातली कुटूंबानी परिस्थिती, घरमातल्या व्यक्तीना देहप्रकृती, हरेकना सोभाव आनी संस्कृती सिक्शन घरना कारभारीनी खरी ताकद आनी तव्हयनी सामाजिक, राजकीय, जगमातल्या घटना आनी तव्हयनी परिस्थिती यासर्व्या गोष्टी घडतीस. त्यानाम्हाई ती निरमान व्हयल -हास.आनी तशीच पुढे बी व्हत -हास. मानूस जनमले येस तव्हय त्याले सोतान्या वेदना त्याना देहले आनी त्यायेयनी तठनी स्थिती, वातावरन तव्हय त्याले सोताले जानीव निरमान व्हस. खरं तो पयले सोताले वयखस.त्यानंतर तो जनम देती मायले आनी घरमातल्या इतर व्यक्तीसले वयखाले लागस.कारन त्याले पयली वयख त्याले सोतानी व्हस मंग जगदून्यानी व्हस. हावू समदा परिनामनी खातरीशीर अशी त्यानी जी परिस्थिती तव्हय -हास तिना परिनाम त्यावर व्हत -हास. पन हाई परिस्थिती तीनी जानीव तव्हयनी परिस्थिती जशी -हास तीनाच परिनाम व्हस. हाई समद खरं चांगला हुशार पंडीतले बी पयली सोतानी जानीव कशी आनी कव्हय व्हस हायी सांगता येवाव नै. तव्हय आपला सारखा सामान्य मानसेसनी बातच कसाले इचारो? सर्वात पयले मानूसले सोतानी खरी जानीव, खरी वयख निरमान झायी तव्हय तो सोताले वयखू लागना. त्यानानंतर जसजसा तो मोठा व्हवाले लागस तसतसे त्याले जगनी दुन्यानी वयख व्हस. हायी दुन्यानी वयख तो सहज करस. तसी ती सुरवात. साधीच - हास.जस वय वाढस तसी ती जानीव पुढे वाढस जास.तो सोताले समजस तेवढी त्याले परिस्थितीनी. समज -हात नै. तरी तो या समदापेक्षा आपून न्यारा शेतस असं तो. सोताले समजू लागस.अशी खातरी त्याले वाटू लागस.पन इतरपेक्षा आपून न्यारा शैतस हायीच समज त्यान अ ज्ञान -हास. पन त्यानी हायीच समज पक्की डोकामा ध्यानमा बसस.पुढे त्याना जीवनमा माय बाप, भाऊबंद, नातलग, मितरमंडयी या सहभागी व्हतस.पन त्यानी.

हायी पक्की भावना व्हयेल -हास त्यामुये तो समरस व्हत नै. कोनामाबी तो सहजपने सामील व्हत नै. सोताले तो देडशाना. समजू लागस. चांगलं वतन आधी घरना बाहेरना संस्कार, शायमधल शिक्शान या समद्या गोष्टी समद्यासन्या सारख्याच -हातुस.हायी मात्र तो ध्यानमा लेत नै. म्हनीसन तो न्यारा वाटू लागस आनी तो सोताले हेकट, एककल्ली असा कोल्लामोल्ला अभिमान ठेवस.दुसराले कुचकामी समजस.कोनासे बी तु-हट सारखा फटकय बोलस.जोडापेक्षा तोडानच काम करस. सोतानी खरी परिस्थिती काय शे ती वयखत नै.आनी पुढे मात्र तो बीन ताकदना व्हस. त्याले पुढे जोयजे तसं यश मियत नै.ह्याना सारखीच समदासनी कमी जास्त परमानमा स्थिती -हास. त्यासनी समाजमा कमी जास्ती संख्या -हातीस.

**- डॉ.प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर. अहिरानी अनुवाद,**

**- प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# गोदावरीचे प्रदूषण थांबविण्यासंदर्भात मनपा आयुक्तांचा नदीपात्र परिसरात दौरा

**नाशिक । प्रतिनिधी**





नाशिक महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांनी मनपा हद्दीतील गोदावरी नदीच्या पात्राची विविध ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी गोदावरी नदीचे प्रदूषण थांबवण्यासंदर्भात विविध उपाय योजना बाबत त्यांनी चर्चा करत संबंधित मनपा अधिकाऱ्यांना निर्देश दिलेत.

शहीद अरुण चित्ते पूल, गंगापूररोड येथे भेट दिली. यावेळी फॉरेस्ट नर्सरी, शहीद अरुण चित्ते पूल, परिची बाग, गोदापार्क परिसर आदी परिसरात खातेप्रमुखांसह फिरून परिसराची पाहणी केली. तसेच आयुक्त डॉ.अशोक करंजकर यांनी पंचवटीतील रामकुंड, गौरी पटांगण, टाळकुटेश्वर पूल, तपोवन, रामसृष्टी, लक्ष्मीनारायण पूल, लक्ष्मीनारायण घाट या परिसराची पाहणी केली. पाहणी दौऱ्या दरम्यान गोदावरी नदीचे प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने विविध उपाय योजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या. या पाहणी दरम्यान गोदावरी नदीपात्रात सांडपाणी मिश्रित होऊ नये, तसेच पाणवेली वाढू नयेत या दृष्टीने उपाययोजना करण्यात याव्यात, त्याचे नियोजन करावे व त्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश यावेळी संबंधित विभाग प्रमुखांना डॉ. अशोक करंजकर यांनी दिले. तसेच गोदावरी नदीत वाढलेल्या पाणवेली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. या पाहणी दौऱ्यावेळी गोदावरी संवर्धन कक्ष प्रमुख उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, रवींद्र धारणकर, गणेश मैंड, राजेंद्र शिंदे, घनकचरा व्यवस्थापन संचालक डॉ. कल्पना कुटे, उपअभियंता नितीन राजपूत, उद्यान निरीक्षक किरण बोडके, उद्धव मोगल, स्वछता निरिक्षक संजय गोसावी, स्वियसचिव दिलीप काठे आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी गोदावरी नदीचे प्रदूषण थांबवण्यासंदर्भात विविध उपाय योजना बाबत त्यांनी चर्चा करत संबंधित मनपा अधिकाऱ्यांना निर्देश दिलेत.

---

# डिजिटल तंत्रज्ञानामुळे लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ तात्काळ प्राप्त

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी दिली माहिती

### सुमारे १९ हजार कोटी निधीच्या विविध विकास कामांना मंजुरी

**नाशिक । प्रतिनिधी**



स्वच्छ भारत अभियान असो की, आरोग्य विषयक योजना त्याचप्रमाणे तरुणांना रोजगार देण्यासाठी स्टार्ट अप इंडिया या यासारख्या विविध योजनांमुळे आपला देश प्रगतीकडे वाटचाल करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातली बलाढ्य अर्थव्यवस्था होऊ पाहत आहे. तर राज्यात मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस - पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकार प्रगतीच्या दिशेने झेप घेत आहे, भारतातील डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे लाभार्थीना विविध योजनांचा लाभ विनाविलंब मिळत आहे, प्रशासनात गतिमानता वाढली आहे आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे भारताकडे संपूर्ण जग प्रगतशील अर्थव्यवस्था म्हणून बघत आहे, अशी माहिती केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी दिली.

यावेळी केंद्र शासनाच्या विविध विकास कामांची पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. त्यापुढे म्हणाल्या की, केंद्र सरकार कडून आरोग्य राज्यमंत्री म्हणून कार्यभार पाहताना त्यांच्या प्रयत्नाने १९ हजार कोटी निधी विविध विकास कामांना मंजुर झाला असून यातील बहुतांशी कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी व्यासपीठावर भाजप प्रदेश प्रवक्ते गोविंद बोरसे उपस्थित होते. या वेळी पत्रकारांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना त्यांनी विकास कामांची माहित दिली. मतदार संघातील विविध ग्रामविकास कामांसाठी ५०० कोटीहून अधिक विकास निधीची तरतूद केली. तर काही कामे प्रगतीपथावर तर काही कामे ही प्रस्तावित आहेत. नाशिक येथे १०० बेडचे क्रिटीकल केअर रुग्णालय अहमदनगर, जळगांव व नंदूरबार येथे प्रत्येकी १०० खाटांचे माता व बालसंगोपन रुग्णालय बांधणे काम प्रगतीत आहे. आरोग्याच्या सुविधांसाठी २५३.७६ कोटींची कामे मंजूर केले असून सदरची कामे सुरू झाली आहेत. त्याचप्रमाणे त्र्यंबकेश्वर येथे ४० कोटीची कामे मंजुर व प्रगती पथावर, कळवण तालुक्यात सांस्कृतिक भवन उभारण्यासाठी १.२० कोटी तर बस स्थानकाच्या नुतनीकरणासाठी ८ कोटी, सुरगाणा तालुक्यातील रस्ते विकासासाठी विविध योजनांतर्गत ४६ कोटी, सुरगाणा बस स्थानक नुतनिकरण ४.१७ कोटी, उबरठाण येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीसाठी ५.५ कोट, हातगड येथे आरोग्य उपकेंद्र उभारण्यासाठी ७५ लक्ष, दिंडोरी येथील रस्ते उभारण्यासाठी २७ कोटी, सांस्कृतिक भवन बांधण्यासाठी ३० लक्ष, बस स्थानक नुतनीकरणासाठी १० कोटी, पेठ तालुक्यातील रस्ते विकासासाठी ३४ कोटी, देवळा तालुक्यातील रस्ते विकासासाठी ४ कोटी, कळवण तालुक्यातील १०५ गावांना प्रत्येकी विकासासाठी २०.३८ लक्ष मंजुर, सुरगाणा तालुक्यातील १४१ गावांना प्रत्येकी विकासासाठी २०.३८ लक्ष, सटाणा तालुक्यातील ५६ गावांना प्रत्येकी विकासासाठी २०.३८ लक्ष रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. या केंद्र मध्ये जनतेसाठी पंतप्रधान आयुष्मान भारत हेल्थ वेलनेस केंद्राच्या सर्व सुविधा मोफत पुरविल्या जाणार आहे. विशेष म्हणजे यात टेलिमेडीसीन सेवाही उपलब्ध असणार आहे. प्रतिबंधात्मक काळजी घेण्यासाठी व आरोग्य सेवा सुधारण्यासाठी सरकारने आयुष्मान भारत आरोग्यवर्धीनी केंद्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. हेल्थकेअर सर्व्हिसेसच्या गुणवत्तेच्या सेवा अधिक सुधारण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सरकारने आयुषमान भारत, डिजीटल मिशन (पीएम- अभिम) सुरू केली आहे. १६०० कोटी रूपयांच्या आर्थिक गुंतवणूकीसह टेलीमेडिसिनसारख्या तंत्रज्ञानाचा लाभ देऊन आणि आरोग्य सेवांची राष्ट्रीय पोर्टेबिलिटी सक्षम करून दर्जेदार आरोग्यसेवेसाठी समान प्रवेश निश्चित करण्याच्या दिशेने एक पाऊल टाकले आहे अशीही माहिती केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी दिली.

---

प्रोसेस जमा — ॲड. एम. सी. बेडसे, साक्री
निशाणी नं.- ६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात**

**फौ. कि. अर्ज नं. ३४/२०२३**

श्री. प्रल्हाद नानाभाऊ तोरवणे, उ. व.-६४, धंदा - शेती,
रा. बेहेड, ता. साक्री जि. धुळे ...**अर्जदार**

**विरुध्द**

निबंधक जन्म-मृत्यु,
**तथा**
म. ग्रामसेवक, ग्रामपंचायत बेहेड,
ता. साक्री जि. धुळे ... **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याने या मे. कोर्टात अर्जदाराची आई नामे कै. सुंदरबाई नानाभाऊ तोरवणे ह्या दि. ०३/११/२००७ रोजी मौजे बेहेड ता. साक्री जि. धुळे येथे मयत झालेली. या विषयी हा अर्ज दाखल केलेला आहे या अर्जात पुढील सुनावणीची तारीख २७/०९/२०२३ रोजी नेमली आहे. तरी कुणास या अर्जाबाबत हरकत असेल तर सकाळी १०.३० वाजता हजर राहून आक्षेप नोंदवावा या करीता हि जाहीर नोटीस असे.

दिनांक- २३/०८/२०२३

**क. लिपिक, फौजदारी न्यायालय, साक्री** (शिक्का) **सहायक अधिक्षक, फौजदारी न्यायालय, साक्री**

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या
जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
मिळकतीचे वर्णन -
मौजे फागणे जि. धुळे येथील गट नं. ५२८ / ३ /ब/१/अ पैकी त्यातील एकुण क्षेत्र १ हे ०९ आर त्यासी चतु:सिमा येणेप्रमाणे,
पुर्वेस :- गट क्रं. ५२९, ५३६ पश्चिमेस :- गट नं ५२९
दक्षिणेस :- कोदी नदी, गट नं ५२६ उत्तरेस :- कोदी नदी
येणेप्रमाणे मिळकत ही श्री. भाऊसाहेब हिलाल पाटील यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे.

आमचे अशिल यांनी वरिल वर्णनाच्या मिळकतीच्या मालकांशी कायमस्वरूपी विकत घेणेकामी सौदा केलेला असुन बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे व मालकांनी बयाणा रकमेचा स्विकार केलेला आहे व अल्पावधितच आमचे पक्षकार हे सदरचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी या मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, करार, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तकार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करून खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध असल्याचे गृहित धरून खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. तसेच ते आमच्या अशिलांवर व सदर मिळकतीवरी बंधनकारक राहणार नाही, तसेच परस्पर वर्तमानपत्रात आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती अधिकार व सांगण्यावरून त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : २२/०८/२०२३

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट
**(ॲड. बी. बी. वाघमारे, धुळे)**

---

प्रोसेस जमा — ॲड. एम. सी. बेडसे.
निशाणी नं.- ६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. २६९/२०२३**

१) गं. भा. सिंधुबाई एकनाथ गायकवाड, वगैरे - ...**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ... **जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. २१/०८/ २०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ यांचे सासरे व अर्जदार नं. २ व ३ यांचे आजोबा नामे कै. दौलत दगा गायकवाड ह्यांचे दि. ०३/०५/१९९२ रोजी मौजे बेहेड ता. साक्री जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

वारसांची नावे — नाते / संबध
१) गं. भा. सिंधुबाई एकनाथ गायकवाड - सुन
२) श्री. विश्वनाथ एकनाथ गायकवाड - नातु
३) गं.भा. भारती हंसराज माळी - नात

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. २९/ ९/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

दि.२२/८/२०२३

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय साक्री** (शिक्का) **सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, साक्री**

---

प्रोसेस जमा — ॲड.राजेश जी. घरटे
निशाणी नं.- ६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. १०२२/२०२३**

१) बापूराव भिकनराव जगताप उ.व.-६५ वर्षे, धंदा- निवृत्त
रा. प्लॉट नं. ७, जमनागिरी रोड, भावसार कॉलनी, धुळे, ता. जि. धुळे
ह.मु. निळकंठ रो हाऊस नं. ३, सर्व्हे नं. ३३०, ईच्छामणी नगर, आडगाव शिवार, नाशिक
२) दिनेश बापूराव जगताप उ.व.-४३ वर्षे, धंदा - नोकरी
रा. प्लॉट नं. ७, भावसार कॉलनी, जमनागिरी रोड, धुळे, ता. जि. धुळे
ह.मु. सर्व्हे नं. २१७/२१८/१/२, पार्क टर्किश बिल्डींग, सदनिका नं. २०३, पार्क स्ट्रीट, वाकड, पूणे, ता. जि. पुणे
३) कु. अर्चना बापूराव जगताप (लग्नापुर्वीचे नाव)
सौ. अर्चना ज्ञानेश्वर पाटील (लग्नानंतरचे नाव ; उ.व. ४० वर्षे, धंदा- नोकरी
रा. प्लॉट नं. ७, जमनागिरी रोड, भावसार कॉलनी, धुळे, ता. जि. धुळे
ह.मु. रो हाऊस नं. १०, अभिनव रो बंगलो, गमणे मळा, मखमलाबाद रोड, नाशिक, ता. जि. नाशिक ...**अर्जदार**

**विरुध्द**

**कुणीही नाही** ... **सामनेवाला**
कै. अलका बापूराव जगताप ...**(मयत)**

**बॉम्बे रेग्युलेशन कायदा VIII १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज**

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी मयत कै. अलका बापूराव जगताप यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि. कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ७ यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. ०३/१०/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) कोर्ट नं. ७ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. अलका बापूराव जगताप यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि.२१/८/२०२३ — आदेशावरुन

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय, धुळे** (शिक्का) **अधिक्षक, दिवाणी न्यायालय, धुळे**

---

प्रोसेस जमा — ॲड.श्री.अनिल एन. वळवी, साक्री
निशाणी नं.- ६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. १९४/२०२३**

कै.एलजी कौतीक निकम - मयत यांचे वारस
गं.भा.सुशिलाबाई एलजी निकम (सुतार) व इतर, उ. व. - ७१, धंदा - मजुरी,
राहणार-चिंचवार, ता.जि.धुळे ...**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**

मयत - कै. कौतिक हेमचंद निकम (मृत्यू दिनांक -२२/११/१९७०)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक ०४/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. गं. भा. सुशिलाबाई एलजी उर्फ येलजी निकम ( सुतार), २. श्री. अशोक एलजी निकम (सुतार), ३. श्री. नानाभाउ एलजी निकम (सुतार), ४. श्री. आण्णा एलजी निकम ( सुतार), ५. सौ. कमलबाई गोकुळ जगताप, ६. गं. भा. इंदुबाई भाईदास निकम (सुतार),७. श्री. प्रकाश भाईदास निकम ( सुतार), ८. सौ. अनिता बंडू वाघ, ९. सौ. सखुबाई एकनाथ मोरे, १०. कु. संदिप रविंद्र बोरसे, ११. कु. पुनम शिरीष उर्फ रविंद्र बोरसे, १२. श्री. समाधान रामदास निकम (सुतार), १३. श्री. दिनेश रामदास निकम (सुतार), १४. श्री. मृणाल संतोष शार्दुल, १५. श्री. प्रतिक संतोष शार्दुल, १६. सौ. कल्पनाबाई राजेंद्र खैरनार, १७. सौ. सुमनबाई दत्तात्रय शार्दुल.

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी, विविधप्रकारच्या शासकिय व निमशासकीय कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक १९/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री
दिनांक - २०/०७/२०२३ — आदेशावरुन,

**क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री** (शिक्का) **सहायक अधिक्षक, सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

प्रोसेस जमा — ॲड.

## जाहिर नोटीस

**साक्री येथिल मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अ. नं. ४०/२०२३**

श्री. रमेश राजाराम महाले उ. व. ४८ धंदा. शेती
रा. बळसाणे, ता. साक्री, जि. धुळे ह.मु. सुरत, ता. जि. सुरत ...**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**

**जाहीर पेपर नोटीस परवानगी अर्ज**

सदर अर्जदार मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते येणेप्रमाणे,

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII) बॉम्बे १८२७ अन्वये वारस दाखला ( हेअरशीप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालयात क स्तर कोर्टात दाखल केला आहे कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की यमुना उर्फ गंगाबेन राजाराम महाले यांचे दि.२०/०८/२०१५ रोजी सुरत, ता. जि. सुरत येथे निधन झाले मयताला मुत्युसमयी खालीलप्रमाणे वारस होते १) श्री. रमेश राजाराम महाले-मुलगा, २) श्रीमती. लताबाई इंदास कुवर-मुलगी, ३) श्रीमती. शानुबाई प्रभाकर शिंदे-मुलगी ४) श्रीमती. उजैन बंडु महाले-सुन

मयताला वरीलप्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही विविध प्रकारच्या सरकारी (शासकीय), निमसरकारी ( निमशासकीय ) व महसुली कामांसाठी दाखला आवश्यक असल्याने वरील वारसव्यतिरीक्त वारस हक्का असल्यास सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीदवारे कळविण्यात येते की वरील वारसा व्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधीकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर यांच्या न्यायालयात दि. ०५/०८/२०२३ रोजी स्वत अगर वकीलामार्फत हजर राहावे वरीलप्रमाणे करण्यास चुकल्यात तर आपल्या या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारचे काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाच्या सही शिक्यानिशी प्रसीध्दीत दिली आहे.

स्थळ- साक्री
दि.३०/०६/२०२३

**कामगिरी लिपीक, दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री** (शिक्का) **सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**

---

प्रोसेस जमा — ॲड.श्री.अक्षय ए. सगर, साक्री
निशाणी नं.- ६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २१८/२०२३**

श्रीमती. मंगलबाई प्रविण जैन व इतर - १,
उ.व.-४५, धंदा-घरकाम,
राहणार-इंदवे, ता. साक्री, जि.धुळे ...**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**

मयत - कै. प्रविण बिरदीचंद जैन - (मृत्यू दिनांक - ३०/१०/२०२१)
मयत -कै. ताराबाई बिरदीचंद जैन - (मृत्यू दिनांक- २०/०८/२०२०)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक १४/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. मंगलबाई प्रविण जैन,
२. कु. प्रेक्षा प्रविण जैन,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी, विविधप्रकारच्या शासकिय व निमशासकीय कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ०२/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साकी, — आदेशावरुन,
दिनांक -२०/०७/२०२३

**क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री** (शिक्का) **सहायक अधिक्षक, सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

## न्यूज कॉलम

### पेपर बॅग अ‍ॅन्ड प्लेट मेकिंगवर प्रशिक्षण

धुळे । जिल्हा उद्योग केंद्र पुरस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे महिन्याचे अनिवासी तांत्रिक उद्योजकता पेपर बॅग अ‍ॅन्ड प्लेट मेकिंग (डिसपोजल) प्रशिक्षण कार्यक्रम होणार आहे. प्रवेशासाठी केंद्राच्या जिल्हा प्रकल्प समन्वयक आरती शेलोरकर, कार्यक्रम समन्वयक विशाल महाले (मो. ८०८७३७३००८) यांच्याशी संपर्क साधावा. प्रशिक्षणाच्या लाभाचे आवाहन उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक उपेंद्र सांगळे, उद्योजकता केंद्राचे विभागीय अधिकारी अलोक मिश्रा, शेलोरकर यांनी केले.

### विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप

**धुळे** । नंदाणे (ता. धुळे) येथील परमपूज्य पांडुरंगदादा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मानव विकास मिशनअंतर्गत ५५ मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले. जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार, सहाय्यक अधिकारी प्रमोद पाटील, शिक्षण विस्ताराधिकारी बी. ए. भामरे, केंद्रप्रमुख जितेंद्र भामरे यांच्या हस्ते वितरण झाले.

# जन्म-मृत्यू दाखले, विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळणार मोफत; अंपळकरांची शिष्टाई

**धुळे । प्रतिनिधी**



धुळेकर नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले व विवाह नोंदणी प्रमाणपत्र मोफत मिळावेत, यासाठी भाजपाचे धुळे महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी जोरदार प्रयत्न चालवले आहेत. यासाठी त्यांनी महापौर प्रतिभा चौधरी यांना निवेदन देतानाच आयुक्तांसोबत बैठकही घेतली. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून लवकरात लवकर धुळेकरांना जन्म-मृत्यू दाखले, विवाह नोंदणी प्रमाणपत्र मोफत मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

याबाबत गजेंद्र अंपळकर यांनी माहिती देताना सांगितले की, धुळे महापालिकेत भाजपाची सत्ता स्थापन झाल्यापासून अनेक योजना शहरात कार्यरत आहेत. शहरातील नागरिक कर रुपाने महापालिकेस सहकार्य करत असते. त्यामुळे नागरीकांना सेवा देण्याच्या बांधिलकीने धुळे महानगरपालिका मार्फत जन्म व मृत्यु नोंद तसेच विवाह नोंदणी होत असते. सदर दाखले हे शहरातील प्रत्येक नागरीकाला गरजेचे व आवश्यक असतात. मात्र, सदर दाखल्यांसाठी खाजगी ठेकेदार मनमानी स्वरुपाची रक्कम आकारतात, दाखले देण्यास नाहक विलंब करतात. परिणामी, नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. खाजगी ठेकेदार नागरीकांना सहकार्य करत नसल्याने नागरिकांवर चकरा मारण्याची वेळ येते. परिणामी, नागरीकांचा रोष वाढतो व यातून महापालिची प्रतिमाही मलिन होते. याबाबत माझ्याकडे सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. याबाबत मी वरिष्ठांशीही बोललो. भाजपाच्या माध्यमातून नागरिकांना सदर दाखले मोफत देण्याबाबत वरिष्ठांशी चर्चा केली आहे. यासंदर्भात आज महापौर प्रतिभाताई चौधरी यांना निवेदन दिले. यापुढे जन्म- मृत्यू दाखले, विवाह नोंदणी प्रमाणपत्रासाठी कुठल्याही प्रकारची फि आकारण्यात येवू नये. सदर दाखल्यांसाठी कोणीही कर्मचारी, एजंट, ठेकदार पैशांची मागणी करत असेल तर प्रशासनाकडे तक्रार करण्याची सूचना करावी, अशी मागणी निवेदनातून केली आहे. शिवाय यासंदर्भात आज आयुक्तांसोबत बैठकही घेतली. नागरिकांना मोफत दाखले कसे देता येतील, यासाठी कायद्यात तरतुद करण्याबाबत आयुक्तांनी शब्द दिला आहे. त्यामुळे मला खात्री आहे की महापालिकेतर्फे लवकरात लवकर हे दाखले विनामुल्य करण्यात येतील, असेही श्री.अंपळकर यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, दाखल्याची दुय्यम प्रत काढण्यासाठी नाममात्र रक्कम आकारली जाईल, असेही ते म्हणाले. यावेळी महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्यासह ओम खंडेलवाल,माजी उपमहापौर कल्याणीताई अंपळकर, भगवान गवळी, प्रदीप कर्पे, हिरामण गवळी, सुनिल बैसाणे, अमोल मासुळे, महेश चौधरी, गुलशन उदासी, जितेंद्र चौटीया, मायादेवी परदेशी, स्नेहल जाधव, महादेव परदेशी आदी उपस्थित होते.

# संशयित हिस्ट्रीशिटरला केले जेरबंद : ११ मोबाईल जप्त

## पिंपळनेर पोलिसांची कामगिरी

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंगवर असलेल्या पथकास संशय आल्याने त्यांनी एका तरूणास ताब्यात घेतले. सदर तरूण हा हिस्ट्रीशिटर निघाला. अधिक चौकशीत या तरूणाच्या ताब्यातील तब्बल ७५ हजार रूपये किंमतीचे ११ मोबाईल जप्त करण्यात पथकाला यश आले. याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२४ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. दि.१९ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास सपोनि.श्रीकृष्ण पारधी, सपोउनि. अशोक पवार, पोहेकॉ प्रकाश सोनवणे, पोना भास्कर सूर्यवंशी, पोना.प्रकाश मालचे पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना एक इसम तोंडावर रूमाल बांधून संशयितरित्या फिरतांना आढळून आला. पोलिसांचे वाहन पहाताच त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. परिणामी, पोना. प्रकाश मालचे यांनी त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. चौकशीत दादू ऊर्फ गाद्या रमेश देसाई (२६) रा.लोणेश्वरी भिलाटी, पिंपळनेर असे नाव त्याने सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ७५ हजार रूपये किंमतीचे तब्बल ११ मोबाईल मिळून आलेत. अधिक चौकशीत तो हिस्ट्रीशिटर असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२४ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपास असई.अशोक पवार यांना सोपविण्यात आला आहे.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो. निरिक्षक श्रीकृष्ण पारधी, असई अशोक पवार, असई लक्ष्मण गवळी, पोहेकॉ प्रकाश सोनवणे, कांतिलाल अहिरे, पोना प्रकाश मालचे, भास्कर सूर्यवंशी, विजयकुमार पाटील, पोकॉ हेमंत पाटोळे, दावल सैंदाणे, पंकज वाघ, रविंद्र सूर्यवंशी, राकेश बोरसे, नरेंद्र माळी यांच्या पथकाने केली. दरम्यान, ज्या नागरिकांचे मोबाईल चोरीस अथवा हरविले असतील त्यांनी पिंपळनेर पोलीस ठाण्यात येवून ओळख पटवून घेवून जावेत, असे आवाहन पिंपळनेर पोलिसांतर्फे करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेकडून ४०% निर्यातशुल्कचा निषेध

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



येथील महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटना भरत दिघोळे यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या पिंपळनेरच्या शेतकऱ्यांनी केंद्र शासनाने कांद्याला योग्य भाव मिळत असताना निर्यातीवर ४०% शुल्क वाढवले त्यामुळे कांदा उत्पादक व व्यापारी व निर्यातदार यांचे मोठे नुकसान होऊन कांद्याचे भाव गडगडणार आहेत ते शुल्क त्वरित मागे घ्यावे असे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय भदाणे,अनिल भामरे, गंगाधर शिंदे,चंदू शेठ,भालचंद्र अहिरराव,निलेश शिंदे,एच एन पाटील भटू शेवाळे,भिका ठाकरे ,काशिनाथ दाभाडे,चेतन बिरारीस,राजेंद्र भदाणे,ज्ञानेश्वर पगारे,दिलीप सुर्यवंशी नंद किशोर सोनवणे,सुशील ठाकरे,भगवान घरटे,यांनी पिंपळनेर स पो नि श्रीकृष्ण पारधी यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या व्यथा शासन दरबारी पाठवाव्यात अशी विनंती केली.

# विवाहितेचा खून; पतीसह चौघांवर गुन्हा

**धुळे** । गाडी घेण्यासाठी माहेरून ३५ हजार रुपये आणावे तसेच आवडत नाही म्हणून विवाहितेला गळफास देत पतीसह चौघांनी खून केल्याचा आरोप झाला. या प्रकरणी संशयित चौघांवर न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल झाला. माधुरी संजय पाटील (वय ३२, रा. दाऊळ, ता. शिंदखेडा) असे मृत विवाहितेचे नाव आहे. पती संजय भगवान पाटील, सायंकाबाई भगवान पाटील, सुरेखा बाळासाहेब पाटील, बाळासाहेब सूर्यकांत पाटील (सर्व रा. धमाणे, ता. धुळे) यांनी माधुरी हीस 'तू मला आवडत नाही, दुसरीला ठेवली आहे' असे बोलून गाडी घेण्यासाठी माहेरून ३५ हजार घेऊन ये, अशी मागणी करीत तिचा छळ केला. बाथरूममध्ये गळफास देत तिचा खून केला. याबाबत माधुरी हिची आई रत्नाबाई किशोर पाटील (रा. धमाणे) यांच्या फिर्यादीनुसार संशयित चौघांवर दोंडाईचा पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला.

# लक्ष्मीकांत शहा यांच्या विरोधातील खोटा गुन्हा रद्द करा

**साक्री । प्रतिनिधी**



१५ ऑगस्ट रोजी म्हसाई माता पतसंस्था निजामपूर येथे म्हसाई चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शहा यांच्यावर हल्ला करणाऱ्या समाजकंटकांविरोधात कडक कारवाई करण्यात यावी तसेच लक्ष्मीकांत शहा यांच्यावर दाखल केलेला खोटा गुन्हा रद्द करण्यात यावा या मागणीचे निवेदन भाजप पदाधिकाऱ्यांनी पोलीस निरीक्षक मोतीराम निकम यांना दिले.

यात त्यांनी म्हटले की, १५ ऑगस्ट रोजी निजामपूर येथे म्हसाई चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शहा यांच्यावर सहा ते सात जणांनी मिळून हल्ला केला होता. याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच लक्ष्मीकांत शहा यांच्यावर निजामपूर पोलीस स्टेशन येथे दाखल झालेला खोटा गुन्हा रद्द करण्यात यावा. तरी त्यांच्यावर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करत शहा यांच्या विरोधात दाखल खोटा गुन्हा रद्द करावा अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी नगरपंचायत उपनगराध्यक्ष बापू गीते, भाजप सरचिटणीस प्रदीपकुमार नांद्रे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय भोसले, जिल्हा परिषद सदस्य विजय ठाकरे, माजी पंचायत समिती सदस्य उत्पल नांद्रे, धनगर समाज संघर्ष समिती उत्तर महाराष्ट्र प्रमुख रमेश सरक, शेतकी संघ संचालक दिनेश सोनवणे, आबासाहेब सोनवणे, नगरसेवक दीपक वाघ, शहर उपाध्यक्ष विनोद पगारिया, काळू सरक, रामदास सरक, भाजप ओबीसी सेल अध्यक्ष महेंद्र देसले, शेतकी संघ संचालक शिरीष सोनवणे, नंदकुमार बागुल, कुंदन देवरे, चेतन जाधव, बाळा खैरनार, शशिकांत भामरे, अष्टाने ग्रामपंचायत सदस्य संदीप अहिरराव, प्रा. शिवाजी देवरे आदी उपस्थित होते.

# डॉ.नरेंद्र दाभोळकरांच्या खुनाच्या आरोपीला अटक करा

## अनिस पिंपळनेर चे निवेदन

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ नरेंद्र दाभोळकर यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी निर्घृण हत्या झाली या हत्येला दहा वर्षे झाली तरी अजून आरोपीना शिक्षा झाली नाही. व त्यामागील मास्टरमाइंड कोण आहे हे अजून शोध लागलेला नाही.पिंपळनेर अनिस तर्फे निर्दशन व निषेध करून खरा सूत्रधार शोधण्याची मागणी पिंपळनेर पोलीस स्टेशन चे साहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण पारधी, अनिस पिंपळनेर चे अध्यक्ष सुरेन्द्र मराठे उपाध्यक्ष व्ही एन जिरे पाटील,देविदास नेरकर, ए बी मराठे, रिकबचंद जैन, जिल्हा प्रधान सचिव सुभाष जगताप जिल्हा कार्यकारणी सदस्य प्रा शिवप्रसाद शेवाळे, शिरीष कुवर, प्रा डॉ सुरेश अहिरे, ललित मराठे, महिला कार्यवाह श्रीमती मनीषा भदाणे, ललिता जाधव, छाया वाडेकर,सुनील भामरे, चंद्रकांत अहिरराव,राजेंद्र भामरे, श्रीकांत मराठे उपस्थित होते.

यावेळी प्रा शिवप्रसाद शेवाळे यांनी प्रास्तविक केले तर स पो नि श्रीकृष्ण पारधी यांनी अनिस ला पूर्ण सहकार्य करून अंधश्रद्धेचे जे प्रकार होतील त्याला कायद्याने प्रतिबंध करू अशी ग्वाही दिली,आभार सुभाष जगताप यांनी मानले. पिंपळनेर अनिस तर्फे निर्दशन व निषेध करून खरा सूत्रधार शोधण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

# हर हर महादेवाच्या घोषणा देत निघाली १४ फुटी ७ ७ त्रिशूळांची शोभा यात्रा

**पिंपळनेर । प्रतिनिधी**




श्री शिवाय नमस्तुभ्यम् हर हर महादेवच्या जय घोषणा देत १४ फुटी भव्य ७ त्रिशुलांची शोभायात्रा सर्व शिव शंभू भक्तांच्या उपस्थितीत काढण्यात आली.

शहरातील सर्व प्राचीन काळातील महादेव मंदिरात त्रिशुळ बसविण्यात येणार आहे. यामध्ये श्री पिंपळेश्वर महादेव मंदिर, श्री कडेश्वर महादेव मंदिर, श्री दंमडकेश्वर महादेव मंदिर, श्री लोणेश्वर महादेव मंदिर, श्री गांगेश्वर महादेव मंदिर, श्री भातोजी महाराज मंदिर, श्री वटकेश्वर महादेव मंदिर आदी मंदिरात सोमवारी त्रिशुळ विधिवत पूजन करून बसविण्यात येणार आहे. शोभा यात्रा वेळी भाविकांनी मोठी गर्दी होती.

शोभायात्रा गांधी चौक येथून सुरू झाली. माळी गल्ली, विश्वनाथ चौक, खोलगल्ली, बाजार पेठ, शिवाजी चौक, नाना चौक, गोपाल नगर, एखंडे गल्ली, मुरलीधर मंदिर, पाटील गल्ली, शनी गल्ली मार्गे गांधी चौकात समारोप झाला. सहा ट्रॅक्टरांवरून त्रिशूलांची मिरवणूक काढण्यात आली. महिलांनी जागोजागी आरती केली व सांयकाळी ज्या मंदिरात त्रिशूळांची स्थापना होणार आहे. त्या मंदिर स्थळी त्रिशूळ पोहचवण्यात आले. प.स.सदस्य देवेंद्र गांगुर्डे यांच्या संकल्पनेतून ग्रामस्थांच्या सहकार्याने या त्रिशूळांची स्थापना होणार आहे.

# दलवाडेत कानबाई माता उत्सव साजरा

**चिमठाणे । प्रतिनिधी**



चिमठाणे दलवाडे येथे विसर्जन खादेशातील सर्वात आनंदाचा व भक्तीभावाचा क्षण मानला जाणारा कानबाई माता उत्सव श्रावण महिन्यात पहिल्या रविवारी होतो. या उत्सवासाठी मुंबई , पुणे नाशिक , गुजरात एम पी या ठिकाणी नोकरी,व्यवसाय,निमित्ताने गेलेले नातलग हे कानूमातेच्या दर्शनासाठी एकत्र येतात. शनिवारी भाजी भाकरीचे रोट हे केले जातात रविवारी मातेचे आगमन होते. यानिमित्त आकर्षक अशी रोषणाई करत सजावट करण्यात आली होती. गावात कोठे लाकडी कानबाई असते तर काही नारळ परनून आणतात त्या नारळाला नथ लावली जाते व चांदीचे डोळे लतात व आकर्षक वस्त्र परिधान केले. लाकडी हता पायाची कानबाईला मुकुट, नथ,कल्ले, कडे,हार साडी ही परिधान केले जाते व संध्याकाळी आकर्षक डेकोरेशन रोषणाई ने सजावलेल्या चौरंग वर स्थापना करण्यात येते. पूजा व आरती केली जाते नंतर रोटपूजा होते. गावातील लोक आपल्या कुटूंबा सोबत मानलेला रोट पुरण पोळी नैवेद्य देण्यास येतात रात्री खान्देशी भाषेचे अहिराणी गाणे म्हटले जातात भजन, भारूळ म्हणत रात्री उशिरा परेंत हा उत्सव आनंदाने साजरी करतात. दुसऱ्या दिवशी कानू मातेच्या विसर्जनासाठी ब्याड,ढोल ,डी जे लावून अहिराणी गाण्यावर तरुण ठेका धरत विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. महिला व जुनी जेष्ठ नागरिक मातेचे अहिराणी गाणे गात आकरा वाजे परेंत बुराई नदी पात्रात पूजा आरती करत विसर्जन मिरवणूक संपन्न झाले.

# खा. डॉ. सुभाष भामरे यांच्या हस्ते फागणे येथे घंटागाडीचे लोकार्पण

**धुळे । प्रतिनिधी**



जिल्हा परिषद अध्यक्षा इंजि. सौ.अश्विनीताई पाटील अन् माजी कृषी सभापती प्रा.अरविंद जाधव यांच्या संकल्पनेतून आणि १५ वित्त आयोगाच्या निधीतून दिलेल्या घंटागाडीचे लोकार्पण खा.डॉ सुभाष भामरे यांच्या हस्ते फागणे ता. धुळे येथे स्वातंत्र्य दिनी करण्यात आले.

फागणे गावाचे क्षेत्रफळ लक्षात घेता कचरा संकलन आणि वहन करण्यासाठी केवळ एक लहान ट्रॅक्टर उपलब्ध होते. ही अडचण लक्षात घेवून विद्यमान सरपंच विद्याताई नगराज पाटील व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी जिल्हा परिषद अध्यक्ष सौ.अश्विनीताई पाटील यांच्याकडे घंटागाडीची मागणी केली होती. पाणीपुरवठा व स्वच्छता या माध्यमातून गावामध्ये चांगल्या प्रकारची स्वच्छता राहावी, गावामध्ये चांगल्या प्रकारचे आरोग्य रहावं ही गावकऱ्यांची भावना लक्षात घेता प्रा. अरविंद जाधव यांच्या संकल्पनेतून सौ.अश्विनीताई पाटील यांनी फागणे गावाकरिता घंटागाडीसाठी ११ लाख रुपये पंधरा वित्त आयोगाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले. या निधीतून खरेदी केलेल्या घंटागाडीचे लोकार्पण स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून खा. डॉ सुभाष भामरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा अश्विनीताई पाटील, माजी कृषी सभापती प्रा. श्री अरविंद जाधव, श्री. गोकुळ सिंघवी, नगराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

फागणे हे सुमारे दहा ते पंधरा हजार लोकवस्तीचे गाव आहे. नजीकच्या बाळापूर गावामध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातून मूलभूत सुविधा पुरवल्या जातात. परंतु फागणे हे गाव जिल्हा परिषद कार्यक्षेत्रांतर्गत येत असल्या कारणाने मूलभूत सुविधांसाठी पुरेसा निधी ग्रामपंचायतकडे उपलब्ध होत नाही. म्हणून ग्रामपंचायतीमार्फत सातत्याने जिल्हा परिषद अध्यक्षांकडे विविध मागणीचा पाठपुरावा करण्यात येतो. त्याची दखल घेत विविध सोई सुविधा चांगल्या पद्धतीने उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. गावासाठी या अगोदर जलजीवन मिशनच्या कामाचे भूमिपूजन खासदार डॉक्टर सुभाष भामरे व जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाल्यानंतर एकंदरीत गावकऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी अध्यक्ष प्रयत्नशील आहेत. याप्रसंगी फागणे गावातील भालचंद्र पाटील, संतोष पाटील, विक्रम पाटील, संजय धनगर, शिवाजी अहीरे, भाईदास पाटील, भालेराव पाटील, अनिल चौधरी, बी. आर. पाटील, विजय पाटील, मोहन अहिरे, हंसराज पाटील, किशोर वाणी, सुभाष पाटील, जितेंद्र पाटील, महेंद्र बोरसे, मधुकर पाटील , श्याम बडगुजर, मनोहर बडगुजर, महेश अहिरे, भटू पाटील, धनराज पाटील, भगवान पाटील, श्रीमती ललिता पाटील, विश्वास फौजी, नंदू भैया फौजी, भालेराव पाटील, भास्कर पाटील, राजेश बडगुजर, त्र्यंबक धनगर, डॉक्टर खैरनार, शिवाजी पाटील, सुरेश पाटील,आदी उपस्थित होते.

**पाहिजेत**

**कार्यालयीन/ऑफीस कामकाजाकरिता मराठी, इंग्रजी टंकलेखक तसेच संगणकाचे** Tally,Execl, Word **चे ज्ञान असलेले मुलगा/मुलगी कामकाजाकरिता तात्काळ पाहिजेत.**

: संपर्क :

**अ‍ॅड.विलास डी.झाल्टे/ अ‍ॅड.सिध्दांत व्ही.झाल्टे**

पत्ता: १५,१६ दिघे अ‍ॅडव्होकेट चेंबर्स, स्टेशन रोड, धुळे.

**मो:९१५६२६९९९९ भेटण्याची वेळ : १२ ते ६ पर्यंत**

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# धुळे शहरातील लक्ष्मी नगरात भरदिवसा ७ लाखांची घरफोडी
















धुळे

। श्रावण मास सुरु असल्याने दर्शनार्थ मंदिरात जाणे सावंत परिवाराला चांगलेच महागात पडले आहे. दर्शन करुन घरी परतेपर्यंत चोरट्यांनी आपला डाव साधत किंमती ऐवज लांबवून नेला. देवपुरात भरदिवसा घडलेल्या या घटनेने मोठी खळबळ माजली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कन्हैयालाल पतपेढीत कार्यरत असलेले रमेश हिरामण सावंत आणि मनपाच्या कर्मचारी सौ.सुरेखा सावंत हे देवपुरातील लक्ष्मीनगरात प्लाट नं. ८ ब मध्ये राहतात. काल सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते देवदर्शनासाठी मंदिरात गेले होते. अवघ्या तासाभरात ते घरी परतले असता घर फोडलेले आढळले. चोरट्यांनी घरातील कपाट फोडून रोकड, सोन्याचे दागिने लंपास केल्याचे समजते. सदर घटनेची माहिती देवपूर पोलिसांना मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. नेमका किती ऐवज लंपास झाला. घरातील १२ ते १५ तोळे वजनाच्या सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले आहे. रमेश सावंत हे कन्हैय्यालाल पतसंस्थेत मॅनेजर होते.ते अलिकडेच निवृत्त झाले आहेत. त्यांच्या पत्नी सुरेखा सावंत ह्या महापालिकेच्या नगरसचिव कार्यालयात कार्यरत आहेत. रमेश सावंत हे दररोज सकाळी ११ वाजेपूर्वी घराला कुलुप लावून सौ.सुरेखा यांना महापालिकेत सोडण्यासाठी जातात. दुपारी साडेबारा ते १ वाजेच्या सुमारास ते घरी जातात. हा त्यांचा नित्यक्रम आहे. याचीच पुरेशी माहिती घेवून रेकी करत चोरट्यांनी संधी साधली. चोरट्यांनी रमेश सावंत यांच्या मुख्य दरवाजाचा कडीकोंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून घरातील सुमारे १२ ते १५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरुन नेले.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र





# कांदा प्रश्न चिघळला : ठाकरे गटाचा आंदोलनाचा इशारा





















धुळे । केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्कात ४० टक्क्यांनी वाढ केली आहे. परिणामी कांदा उत्पादक शेतकरी चांगलाच अडचणीत आला आहे. कांद्याला बाजारपेठ न मिळाल्याने हातातोंडाशी आलेला कांदा ऐन मोसमात रडवित असल्याने या निषेधार्थ धुळ्यात शिवसेना ठाकरे गटाने तीव्र आंदोलन छेडले आहे. धुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच भर रस्त्यावर कांदा फेक करत केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी कांद्याच्या माळा गळ्यात घालून राज्य आणि केंद्र सरकारचा निषेधही करण्यात आला. धुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आलेल्या या आंदोलनाने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. एप्रिल ते जुलै महिन्याच्या कालावधीत ५० टक्के पेक्षा अधिक कांदा सडल्याने उकीरड्यावर फेकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली होती. गेल्या चार ते पाच वर्षांपासून ८०० ते १ हजार रूपयांपेक्षा अधिक भाव कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मिळालेला नाही. कांद्याचे भाव वाढत असतानाच केंद्र सरकारने ४० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. केंद्र सरकारचे हे धोरण अन्यायकारक असून यामुळे सामान्य शेतकऱ्यांचे जगणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे या निर्णयाला केंद्र शासनाने त्वरीत स्थगिती द्यावी, अन्यथा शेतकऱ्यांचा उद्रेक होईल. येणाऱ्या काळात भाजपच्या पुढाऱ्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला. धुळे जिल्ह्याचे खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांनी कांद्या प्रश्न यावर अद्याप आपले तोंड उघडलेले नाही. खासदार सुभाष भामरे यांनी तातडीने संबंधित मंत्र्यांची भेट घेऊन कांद्यावरील निर्यात शुल्क रद्द करावा. तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांद्याला किमान दोन हजार रुपये क्विंटल मिळावा. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून रोखावे असे न झाल्यास धुळ्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचे आमदार खासदार आणि मंत्री यांच्या गाड्यांवर कांदा फेकून मारू आणि यापुढे आम्ही मंत्र्यांच्या गाड्यांवर कांदा फेक आंदोलन करू, असा गंभीर इशारा माजी आमदार पाटील यांनी यावेळी दिला.

संकलन : दिपक वाघ